MHST010021032020

दाखल तारीख – १४.०९.२०२०
नोंदणी तारीख – ०२.११.२०२०
निकाल तारीख – २०.०७.२०२६
कालावधी – वर्ष – महिने – दिवस
०५ १० ०६

**<u>मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, सातारा</u>**
(अध्यक्ष अरविंद शं. वाघमारे)
**<u>मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र. १२७/२०२०</u>**

**<u>निशाणी क्र. ४७</u>**

१. **श्रीमती सीमा विलास शेडगे,**
वय वर्षे– ४५, धंदा– घरकाम,
२. **श्री.अक्षयकुमार विलास शेडगे,**
वय वर्षे– २१, धंदा–घरकाम,
दोघे रा. भरतगाव, ता.जि.सातारा.
... अर्जदार

विरुध्द

१. **श्री. अक्षय नवनाथ पवार,**
वय वर्षे– सज्ञान, धंदा– व्यापार,
रा. भरतगाववाडी, ता.जि. सातारा.
२. **विभागीय व्यवस्थापक,**
**टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कं.लि.**
पत्ता– उत्तेकर आर्केड, बँक ऑफ महाराष्ट्र जवळ,
बॉम्बे रेस्टॉरंट, सातारा.
... सामनेवाले

<u>अर्जदारांतर्फे वकील – श्री. एस.डी. भोसले.</u>
<u>सामनेवाला क्र.१ तर्फे वकील– श्री. ए.जी. जमादार.</u>
<u>सामनेवाला क्र.२ तर्फे वकील– श्री.एस.बी.गोवेकर.</u>

**<u>न्यायनिर्णय</u>**
(जाहीर दिनांक २० जुलै २०२६)

अर्जदार क्र.१ यांचा मुलगा आणि अर्जदार क्र.२ यांचा भाऊ अजय विलास शेडगे, वय २५ वर्षे यांचा वाहन अपघातात मृत्यू झाल्यामुळे नुकसान भरपाई रक्कम रुपये ६५,००,०००/– मिळण्याकरीता अर्जदारांनी प्रस्तुत प्रकरण मोटार वाहन कायदा १९८८ चे

कलम १६६ अन्वये दाखल केले आहे.

०२. अर्जदारांचे कथन थोडक्यात असे आहे की, दि.०३.०७.२०२० रोजी सायंकाळी ०५.३० वाजताचे सुमारास मयत अजय विलास शेडगे हे मोटरसायकल क्र. एम.एच.११सी.एफ.६९८५ (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर मोटरसायकल'' असा करण्यात येईल.) वर पाठिमागे बसून तारळे ते काशीळ रस्त्याने जात होते. सामनेवाला क्र.१ हे मयत अजय प्रवास करत असलेली सदर मोटरसायकल भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवित होते. सदर मोटरसायकल अपघात ठिकाणी आली त्यावेळी समोरुन एक जिप चालक त्याच्या ताब्यातील जिप भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवित आला. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याला त्याच्या ताब्यातील सदर मोटरसायकल नियंत्रीत न झाल्याने दोन्ही वाहनांची धडक झाली व त्यामध्ये मयत अजय यांचा जागीच मृत्यू झाला. सदर अपघात हा दोन्ही वाहनांच्या चुकीने झाला असून अपघातात सदर मोटरसायकल चालक, सामनेवाला क्र.१ यांचा जास्त निष्काळजीपणा आहे. तरीही पोलीसांनी जिप चालकाविरुद्ध गु.र.क्र.३०५/२०२० चुकीने दाखल केला. अपघाताचे वेळी सदर मोटरसायकल सामनेवाला क्र.१ चालवित होता. या वाहनाचा विमा सामनेवाला क्र.२ या विमा कंपनीकडे उतरविलेला होता. त्यामुळे सामनेवाला क्र.१ व २ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

०३. मयत अजय याचे वय अपघातावेळी २५ वर्षे होते. ते पोलीस म्हणून नोकरीस होते व त्यांना दरमहा रुपये ५०,०००/– इतके वेतन मिळत होते. तसेच ते ऊसाची शेती करत होते व त्यांना दरसाल रुपये १,२०,०००/– उत्पन्न मिळत होते. मयत अजय यांच्या आकस्मीक निधनामुळे अर्जदारांनी सामनेवाला क्र.१ व २ यांचेकडून विविध विभागाखाली संयुक्तिक आणि अलगपणे रुपये ६५,००,०००/– नुकसान भरपाई मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल

केला आहे.

०४. सामनेवाला क्र.१ यांनी लेखी कैफियत निशाणी ४७ लगत दाखल करुन अर्जदारांची कथने नाकारली आहेत. ते मोटरसायकल भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवित नसल्याचे व दुसऱ्या वाहनाच्या निष्काळजीपणाने अपघात झाल्याचे कथन केले आहे. अपघातावेळी सदर मोटरसायकल सामनेवाला क्र.२ या विमा कंपनीकडे विमाकृत होती. त्यांनी विमा पत्रातील अटी व शर्तींचा भंग केला नसल्याने नुकसान भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी सामनेवाला क्र.२ यांची आहे. त्यांनी मयताचे वय, व्यवसाय व उत्पन्न नाकारले आहे. या आणि इतर मुद्यांवर अर्जदारांचा दावा त्यांच्याविरुद्ध फेटाळण्यात यावा अशी सामनेवाला क्र.१ यांनी विनंती केली आहे.

०५. सामनेवाला क्र.२ यांनी सदर प्रकरणामध्ये हजर होऊन त्यांची कैफियत निशाणी १९ अन्वये दाखल केली असून असे कथन केले आहे की, सदर अपघातामध्ये जिप चालकाची चूक होती व सदर मोटरसायकल चालकाची कोणतीही चूक नव्हती. अपघाताचा गुन्हा कमांडर जिप चालकाविरुद्ध दाखल करणेत आला. अर्जदारांनी सदर मोटरसायकलच्या विमा कंपनीस चुकीने पक्षकार केले आहे. विमा कंपनीने मयत अजय यांचे वय, व्यवसाय, त्याचे दरमहा असलेले उत्पन्न, अर्जदारांचे मयतावर असलेले अवलंबित्व इत्यादि गोष्टी अमान्य केलेल्या आहेत व अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाहीत असे नमुद करुन त्यांच्याविरुध्द क्लेम अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०६. माझे पूर्वाधिकारी यांनी अर्जदार व सामनेवाला यांच्या कथना आधारे निशाणी २० प्रमाणे वादप्रश्न निश्चित केले आहेत. त्या वादप्रश्नांवर त्यालगत माझे निष्कर्ष आणि त्यांची कारणमीमांसा खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | मौजे पाली गावच्या हद्दीत तारळे–काशीळ रस्त्यावर दिनांक ०३.०७.२०२० रोजी सायंकाळी ०५.३० च्या सुमारास मोटरसायकल क्र. एम.एच.११सी.एफ.६९८५ आणि जीपच्या झालेल्या अपघातात मयत अजय विलास शेडगे यांचा मृत्यू झाल्याचे अर्जदार सिद्ध करतात काय ? | होय. |
| २. | मोटरसायकल क्र. एम.एच.११सी.एफ.६९८५ च्या चालकाने मोटरसायकल भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालविल्याने अपघात झाल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | नाही. |
| ३. | अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती व कोणाकडून? | नाही. |
| ४. | निवाडा काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

०७. अर्जात केलेली विधाने सिध्द करणेसाठी अर्जदारांतर्फे खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रथमवर्दी अहवाल. | नि. २२ |
| २ | घटनास्थळ पंचनामा. | नि. २३ |
| ३ | शवाचा पंचनामा. | नि. २४ |
| ४ | शव विच्छेदन अहवाल. | नि. २५ |
| ५ | मोटरसायकलचे नोंदणी प्रमाणपत्र. | नि. २६ |
| ६ | सामनेवाला क्र.१ यांचा वाहन चालविण्याचा परवाना. | नि. २७ |
| ७ | मोटरसायकलची विमा पॉलीसी. | नि. २८ |
| ८ | अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.२ यांना साक्ष देण्यासाठी दिलेला | नि. ३६ |

| | | |
|---|---|---|
| | आदेश. | |
| ९ | मयत अजय यांचे माहे मार्च ते जुन २०२० चे पगाराचे दाखले. | नि. ३७ |
| १० | मयत अजय याचा माहे जुलै २०१७ चा पगाराचा दाखला. | नि. ४५ |
| ११ | फेरफार नोटीस व ७/१२ उतारे. | नि. ४६ |

०८. अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र.१ श्रीमती सीमा विलास शेडगे यांचा पुरावा निशाणी १५ प्रमाणे सरतपासाचे शपथपत्र सादर केले. मयत अजय यांच्या पगारापासूनच्या उत्पन्नाच्या शाबीतीसाठी साक्षीदार क्र.२ रागिनी राजाराम मोहिते यांचा जबाब निशाणी ३३ अन्वये नोंदविला. तसेच साक्षीदार क्र.३ सचिन संजय शिंदे यांचा जबाब निशाणी ४० अन्वये नोंदवला. अर्जदारांच्या कथनांचे खंडण करणेसाठी सामनेवाला क्र.१ श्री.अक्षय नवनाथ पवार यांनी स्वतःचा पुरावा निशाणी ४६ अन्वये नोंदवला आहे.

०९. अर्जदार आणि सामनेवाला यांचे विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

१०. अर्जदार यांचेतर्फे दाखल करणेत आलेल्या खालीलप्रमाणे न्यायनिर्णयांचे अवलोकन करण्यात आले.

1) *Pawan Kumar Vs. M/s Harkishan Das Mohan Lal, LAWS(SC)2014-1-62.*
2) *T.O. Anthony Vs. Karvarnan, LAWS(SC)2008-2-132.*
3) *Gujarat State Road Trans.Corpn. Vs. Shardabai, LAWS(MPH)1995-8-19.*
4) *New India Assurance Co.Ltd. Vs. Alpa Rajesh Shah, LAWS(BOM)2013-10-74.*
5) *Shailaja Vs. Pavan B. Udupudi, LAWS(SC)2025-1-183.*
6) *Prabhavathi Vs. Managing Director, Bangalore Metropolitan, Transport Corporation,LAWS(SC)2025-2-114.*

**मुद्दा क्रमांक १ ते ४** –

११. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहेत.

१२. अर्जदार क्र.१ श्रीमती सीमा विलास शेडगे यांनी सर्व अर्जदारांच्यावतीने पुराव्याचे शपथपत्र निशाणी १५ प्रमाणे सादर केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, दि.०३.०७.२०२० रोजी सायंकाळी ०५.३० वाजताचे सुमारास मयत अजय विलास शेडगे हे सदर मोटरसायकलवर पाठिमागे बसून तारळे ते काशीळ रस्त्याने जात होते. सामनेवाला क्र.१ हे मयत अजय प्रवास करत असलेली सदर मोटरसायकल भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवित होते. त्यावेळी समोरुन एक जिप चालक त्याच्या ताब्यातील जिप भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवित आला. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याला त्याच्या ताब्यातील सदर मोटरसायकल नियंत्रीत न झाल्याने दोन्ही वाहनांची धडक झाली व त्यामध्ये मयत अजय यांचा जागीच मृत्यू झाला. सदर अपघात हा दोन्ही वाहनांच्या चुकीने झाला असून अपघातात सदर मोटरसायकल चालक, सामनेवाला क्र.१ यांचा जास्त निष्काळजीपणा आहे. तरीही पोलीसांनी जिप चालकाविरुद्ध गु.र.क्र.३०५/२०२० चुकीने दाखल केला. अपघाताचे वेळी सदर मोटरसायकल सामनेवाला क्र.१ चालवित होता. या वाहनाचा विमा सामनेवाला क्र.२ या विमा कंपनीकडे उतरविलेला होता. त्यामुळे सामनेवाला क्र.१ व २ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. त्यामुळे अर्जदारांना रुपये ६५,००,०००/– इतकी नुकसान भरपाई मिळावी असे कथन केले आहे.

१३. सामनेवाला क्र.१ यांनी या साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही. सामनेवाला क्र.२ यांनी घेतलेल्या उलटतपासात त्यांनी अपघात स्वतः पाहिला

नसल्याचे कबुल केले आहे. तसेच अपघात हा कमांडर जीप चालकाच्या चुकीने झाला असल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती असे कबुल केले आहे. अपघात सामनेवाला क्र.१ यांच्या चुकीने झाला नाही या प्रश्नास त्यांनी नकारार्थी उत्तर दिले आहे.

१४. अपघात कसा झाला हे स्पष्ट होण्यासाठी अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र.३ श्री.सचिन संजय शिंदे याचा जबाब निशाणी ४० अन्वये नोंदवण्यात आला. त्याने सरतपासात असे कथन केले आहे की, दि.४.७.२०२० रोजी तो स्वतः, अक्षय, शुभम आणि अजय असे काशिळ–पाली रस्त्याने काशिळ येथे दोन वेगवेगळ्या दुचाकीवरुन निघाले होते. सामनेवाला क्र.१ अक्षय याच्या दुचाकी वाहनावर तो व मयत अजय बसले होते. त्याच्या दुचाकीवर तो आणि शुभम बसला होता. ते पाली गावच्या हद्दीत नर्सरी ओढा येथे पोहोचले. त्यावेळी हलका पाऊस येत होता. त्यावेळी एक कमांडर जिप गाडी भरधाव वेगात समोरुन आली. त्या जिपची व अक्षयच्या मोटरसायकलची रस्त्याच्या मधोमध धडक झाली. तो रस्ता लहान व वळणाचा होता. अपघातामध्ये अक्षय आणि अजय या दोघांना खूप जखमा झाल्या व अपघातामुळे अजय याचा मृत्यू झाला. सामनेवाला क्र.१ यांच्यावतीने या साक्षीदाराचा उलटतपास घेणेत आला नाही. सामनेवाला क्र.२ तर्फे घेणेत आलेल्या उलटतपासात या साक्षीदाराने कबुल केले आहे की, अपघाताच्या वेळी साधारण सायंकाळचे ५ वाजले होते व उजेड होता. त्यावेळी समोरुन एक जिप वेगाने आली व तिने मोटरसायकलला धडक दिली. अक्षय याने पोलीस ठाण्यात जावून तक्रार दाखल करेपर्यंत तो अक्षय सोबत असल्याचे व अक्षय याने जिप चालकाविरुद्ध तक्रार दिल्याचे कबुल केले आहे. तसेच त्या जिप चालकाविरुध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आल्याचेही कबुल केले आहे. त्याने अपघातावेळी मोटरसायकल व जिप रस्त्याच्या मधोमध असताना अपघात

झाल्याचे कोणालाही सांगितले नसल्याचे मान्य केले आहे.

१५. अर्जदारांच्या कथनांचे खंडण करण्यासाठी सामनेवाला क्र.१ यांनी स्वतःचा जबाब निशाणी ४६ अन्वये नोंदवला आहे. त्यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, अपघातावेळी सदर मोटरसायकलवर मयत अजय त्याच्या मागे बसला होता. त्यावेळी समोरुन कमांडर जीप निमुळत्या वळणाच्या रस्त्यावर भरधाव वेगात आली व तिने सदर मोटरसायकलला जोराची धडक दिल्याने अपघात होऊन अपघातात त्याला गंभीर जखमा होऊन मयत अजय याचा मृत्यू झाला. अपघात कमांडर जीप चालकाच्या चुकीने झाला असून अर्जदारांनी जिप चालक, मालक व विमा कंपनीस प्रस्तुतकामी पक्षकार केले नाही. वास्तविक पाहता सदरची नुकसान भरपाई देण्यास जिप चालक, मालक व विमा कंपनी जबाबदार आहे. सरतपासात पुढे या साक्षीदाराने निशाणी २२ कडील प्रथम वर्दि अहवाल व निशाणी २३ कडील घटनास्थळाचा पंचनामा व त्यातील मजकुर मान्य व कबुल असल्याचे कथन करुन अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा असे कथन केले आहे.

१६. अर्जदारांतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात या साक्षीदाराने अपघातठिकाणचा रस्ता अरुंद, वळणाचा व दोन्ही बाजूंनी उताराचा असल्याचे व अपघात रस्त्याच्या मध्ये झाल्याचे कथन केले आहे. या साक्षीदाराने अपघात पूर्णपणे त्याच्या चुकीने झाल्याचे नाकारले आहे.

१७. सामनेवाला क्र.२ यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात या साक्षीदाराने कथन केले आहे की, अपघातावेळी ते त्यांची मोटरसायकल सावकाश चालवित होते. समोरुन कमांडर जीप वेगाने आली व त्यांच्या मोटरसायकलला धडकली. अपघात जीप चालकाच्या चुकीने झाला. जीप चालक व मालक हे

नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. त्यांनी उलटतपासात पुढे असे कथन केले की, त्यांनी अपघात झाल्याबरोबर पोलीसांना खबर दिली होती व त्यातील मजकुर खरा असल्याचे कथन केले.

१८. त्यांनी उलटतपासात पुढे असे कथन केले की, त्यांच्या फिर्यादीवरुन जीप चालकाविरुध्द पोलीसांनी फौजदारी केस केली. त्यांच्याविरुध्द पोलीस कारवाई करण्यात आली नाही. त्यांनी हे ही मान्य केले की, अपघातावेळी दोन्ही वाहने सारख्याच वेगात असल्याचे व अपघात रस्त्याच्या मधोमध झाल्याचे त्यांनी पोलीसांना सांगितले नव्हते.

१९. सामनेवाला क्र.१ यांच्या पुराव्याचे अवलोकन करता त्यांनी सरतपासात तसेच उलटतपासातही अपघात जिप चालकाच्या चुकीने झाल्याचे कबुल केले असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे अपघातात सदर मोटरसायकल चालकाचा निष्काळजीपणा असल्याचे शाबीत होत नाही.

२०. अर्जदारांच्यावतीने सादर करण्यात आलेला तोंडी व लेखी पुरावा तसेच निशाणी २२ कडील प्रथम वर्दि अहवाल, निशाणी २३ कडील घटनास्थळाच्या पंचनाम्यातील मजकुरावरुन हे स्पष्ट होते की, दिनांक ०३.०७.२०२० रोजी सायंकाळी ०५.३० च्या सुमारास सदर मोटरसायकल व कमांडर जीप या वाहनांमध्ये अपघात होऊन अपघातात अर्जदाराचे पती मयत अजय हे जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला.

२१. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, मोटरसायकल क्र. एम.एच.११सी.एफ.६९८५ च्या चालकाने मोटरसायकल भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालविल्याने अपघात झाला. तर सामनेवाला क्र.१ व २ यांच्या

कथनाप्रमाणे प्रस्तुतचा अपघात हा सदर जिप चालकाच्या चुकीने झाला. आता प्रश्न हा उपस्थित होतो की, प्रस्तुतचा अपघात नेमका कोणाच्या चुकीने झाला?

२२. सामनेवाला क्र.१ अक्षय नवनाथ पवार याने अपघाताची खबर दिली होती. त्याने निशाणी ४६ कडील उलटतपासादरम्यान त्याच्या खबरीमधील मान्य केलेला खालीलप्रमाणे मजकुर प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी अत्यंत महत्वाचा असून तो येथे उद्धृत करण्यात येतो.

*"आम्ही आमच्या मोटार सायकल तारळे ते काशिळ रोडवरुन चालवित घेऊन जात असताना पाली ता.कराड गावच्या हद्दीत नर्सरी ओढ्याजवळ अचानक काशीळ बाजूकडून भरधाव वेगात आलेल्या कमांडर जीपने मी चालवित असलेल्या मोटार सायकलला समोरुन जोराची धडक देवून अपघात झाला तसे आम्ही दोघे मोटार सायकलवरुन उडून रोडचे कडेला पडलो, त्यानंतर लगेचच बरेचसे लोक जमा झाले. अपघातात माझे उजव्या पायाचे गुडघ्याला व पायाच्या पंजाला व डोक्यास मार लागून जखमी झालो होतो. माझ्या पाठीमागे बसलेल्या अजय शेडगे यास डोकीस मार व पायास गंभीर मार लागून जखमी होऊन बेशुध्द पडला होता. त्यानंतर काही वेळातच १०८ ॲम्ब्युलन्स आली व तेथे जमलेल्या लोकांचे मदतीने आम्हा दोघांना ॲम्ब्युलन्स मधून सिव्हील हॉस्पीटल, सातारा येथे औषधोपचारासाठी दाखल केले, तेथील डॉक्टरांनी माझ्यावर उपचार करुन पुढील उपचारासाठी यशवंत हॉस्पीटल, सातारा येथे पाठविले. यशवंत हॉस्पीटल, सातारा येथील डॉक्टरांनी माझ्यावर उपचार सुरु केले आहेत. सध्या माझी तब्बेत बरी असून मी शुद्धीत आहे. सदरचा अपघात सायंकाळी ०५.३० वाजताचे सुमारास झाला असून सदरचा अपघात कमांडर जीप वरील चालकाच्या चुकीमुळे झाला आहे, माझा वरील जबाब यशवंत हॉस्पीटल, सातारा येथे उपचार घेत असताना घेतलेला जबाब मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर असून*

*त्यावर मी सही केली आहे*'.

२३. पुढे सामनेवाला क्र.१ यांनी अपघात जीप चालकाच्या चुकीने झाल्याने जीप चालक व मालक हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार असल्याचे तसेच त्यांनी अपघात झाल्याबरोबर पोलीसांना खबर दिली होती व त्यातील वर नमुद प्रमाणे मजकुर खरा असल्याचे मान्य केले आहे.

२४. अपघात कसा झाला याबाबत अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र.३ श्री.सचिन संजय शिंदे याचा जबाब निशाणी ४० अन्वये नोंदवण्यात आला. त्यामध्ये प्रथमच त्याने अपघातात जिपची व मोटरसायकलची रस्त्याच्या मधोमध धडक झाल्याचे कथन केले आहे. ही बाब त्याने यापूर्वी कोणासही सांगितली नसल्याचे उलटतपासात कबुल केले आहे. सामनेवाला क्र.२ तर्फे घेणेत आलेल्या उलटतपासात या साक्षीदाराने अक्षय याने पोलीस ठाण्यात जावून तक्रार दाखल करेपर्यंत तो अक्षय याच्यासोबत असल्याचे व अक्षय याने जिप चालकाच्याविरुद्ध तक्रार दिल्याचे कबुल केले आहे.

२५. अर्जदारांच्या विधीज्ञांनी युक्तिवादादरम्यान असे कथन केले की, प्रस्तुतचा अपघात सदर मोटरसायकल व सदर जिप चालकाच्या सहयोगी निष्काळजीपणामुळे झाला असून अपघातातील वाहनांपैकी दोन्ही अथवा कोणत्याही एका वाहनाच्या मालक व विमा कंपनीकडून अर्जदार नुकसानभरपाई मागू शकतात. त्यांनी पुढे असे कथन केले की, अपघातात सदर मोटरसायकल चालकाचीच जास्त चूक होती. येथे या मुद्याबाबत असा प्रश्न उपस्थित होतो की, अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे अपघातात जर सदर मोटरसायकल चालकाची जास्त चुक होती तर पोलीसांनी जिप चालकावर गुन्हा दाखल का केला ? ही बाब समोर येण्यासाठी सदर जिप चालक, मालक व विमा कंपनीस प्रस्तुतकामी पक्षकार

म्हणून सामिल करणे आवश्यक होते. परंतु अर्जदारांनी सदर जिप चालक, मालक व विमा कंपनीस प्रस्तुतकामी पक्षकार म्हणून सामिल केले नाही. फक्त अर्जदारांच्या कथनांच्या आधारे सदर मोटरसायकल चालकाचा निष्काळजीपणा जास्त असल्याचे अथवा जिप चालक व मोटरसायकल चालकाच्या सहयोगी निष्काळजीपणाची टक्केवारी ठरविता येणार नाही.

२६. सामनेवाला क्र.१ व २ यांचे विधीज्ञांनी युक्तिवादादरम्यान पुढे असे कथन केले की, अपघात केवळ जिप चालकाच्या चुकीने झाल्याने अपघाताचा गुन्हाही सदर जिप चालकावर नोंदविण्यात आला आहे. अर्जदारांनी सदर जिप चालक, मालक व विमा कंपनीस प्रस्तुतकामी पक्षकार म्हणून सामिल केले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

२७. अर्जदारांच्यावतीने सादर करण्यात आलेल्या वर नमुद अ.क्र. १ ते ३ कडील न्यायनिर्णयांनुसार जेव्हा दोन वाहनांच्या निष्काळजीपणामुळे एखाद्या तिसऱ्या व्यक्तीला अपघात होतो, तेव्हा ते 'संमिश्र निष्काळजीपणा' चे प्रकरण ठरते आणि दोन्ही वाहनांचे चालक, मालक व विमा कंपनी किंवा दोन्ही वाहनांपैकी कोणत्याही एका वाहनाचे चालक, मालक व विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यासाठी 'संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे' जबाबदार असतात. उपलब्ध पुराव्याचे वरील प्रमाणे विवेचन विचारात घेता अर्जदारांनी सदर जिप चालक, मालक व विमा कंपनीस प्रस्तुतकामी पक्षकार म्हणून सामिल केले नाही, तसेच मोटरसायकल चालकाचा संयुक्त अथवा अंशदायी निष्काळजीपणा होता ही बाब शाबीत केली नाही. सबब, वर नमुद अ.क्र.१ ते ३ कडील न्यायनिवाड्यांतील व प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती भिन्न असल्याने सदरचे न्यायनिवाडे प्रस्तुत प्रकरणी लागू करता येणार नाहीत. अर्जदारांच्यावतीने सादर करण्यात आलेले वर नमुद अ.क्र.४ ते ६ कडील न्यायनिवाडे हे नुकसान भरपाईच्या परिगणनेशी संबंधीत मुद्यांबाबत

आहेत. तथापी, उपलब्ध पुराव्याचे वरील प्रमाणे विवेचन विचारात घेता अर्जदार हे सामनेवालांकडून नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नसल्याचे दिसून येते.

२८. अर्जदार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ सचिन शिंदे आणि सामनेवाला क्र.१–मोटरसायकल चालक, अक्षय पवार यांनी त्यांच्या पुराव्यात सदरचा अपघात हा जिप चालकाच्या चुकीने झाल्याचे कबुल केले आहे. तसेच निशाणी २२ कडील प्रथमवर्दि अहवाल आणि निशाणी २३ कडील घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन करता सदरचा अपघात हा जिप चालकाच्या चुकीनेच झाल्याचे दिसून येते. येथे हे नमुद करणे आवश्यक वाटते की, अर्जदारांनी फक्त अर्जात व सरतपासात केलेल्या कथनांच्या आधारे सदर मोटरसायकल चालकाच्या संयुक्त अथवा अंशदायी निष्काळजीपणाने अपघात झाल्याची बाब मान्य करणे योग्य होणार नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१– मोटरसायकलचे मालक व सामनेवाला क्र.२–विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार राहात नाही.

२९. अर्जदारांच्या कथनानुसार मयत अजय हे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर नोकरीस होते. त्यांना माहे जून–२०२० चा पगार रुपये ३९,६३९/– इतका मिळाला होता. मयत अजय याच्या निधनामुळे ते उत्पन्न बंद झाले आहे. या कथनाच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी साक्षीदार क्र.२ रागिनी राजाराम मोहिते यांचा जबाब निशाणी ३३ अन्वये नोंदविला आहे. साक्षीदार क्र.२ रागिनी मोहिते यांनी जबाबात असे कथन केले की, मयत अजय हे त्यांच्या खात्यात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते. त्यांनी मयत अजय यांचे माहे मार्च–२०२० ते जून २०२० या कालावधीचे पगाराचे दाखले निशाणी ३७ अन्वये दाखल केले आहेत. त्यानुसार मयत अजय यांना माहे जून–२०२० मध्ये रुपये ३९,६३९/– इतके एकूण वेतन मिळत होते. सबब, मयत अजय यांचा माहे जून–२०२० चा शेवटचा पगार रुपये

३९,६३९/– मधून व्यवसाय कराचे रुपये २००/– वजा जाता दरमहा रुपये ३९,४३९/–इतका पगार मिळत असल्याचे दिसून येते.

३०. सामनेवाला क्र.१ यांनी या साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही. सामनेवाला क्र.२ यांनी घेतलेल्या उलटतपासात त्यांनी कोवीडच्या कालावधीत कर्मचाऱ्यांना मुळ पगाराच्या ७५ टक्के पगार दिला जात होता असे कथन केले आहे.

३१. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे मयत अजय यांचे वय अपघातावेळी २५ वर्षे इतके होते. परंतु याबाबतचा कोणताही पुरावा अर्जदार यांनी प्रस्तुतकामी सादर केला नाही. तथापी निशाणी ३७ अन्वये दाखल केलेल्या पगारपत्रकामध्ये मयत अजय यांची जन्म तारीख १६.०२.१९९५ अशी नमुद आहे. त्याप्रमाणे अपघात समयी मयत अजय यांचे वय २५ वर्षे ४ महिने पूर्ण असल्याचे दिसून येते. तसेच शवविच्छेदन अहवाल आणि शवाच्या पंचनाम्यामध्ये मयताचे वय २५ वर्षे इतकेच नमुद केले आहे. सबब, अपघाताच्या वेळी मयत अजय यांचे वय २५ वर्षे असल्याचे दिसून येते.

३२. अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.१ यांनी उलटतपासात मयत यांना शेती असल्याबाबत व शेतीतून उत्पन्न मिळत असल्याबाबतचा कोणताही पुरावा प्रस्तुतकामी दाखल केला नसल्याचे कबुल केले आहे. सबब, मयत अजय याच्या निधनामुळे अर्जदारांचे शेतीपासूनच्या उत्पन्नाचे नुकसान झाल्याची बाब शाबीत होत नाही.

३३. प्रस्तुतकामी अर्जदारांनी मयत अजय यांना पगारापासून मिळत असलेले उत्पन्न शाबीत केले असले तरी उपलब्ध पुराव्याचे वरीलप्रमाणे विवेचन विचारात घेता अर्जदार हे सामनेवालांकडून नुकसान भरपाई मिळण्यास पात्र

नसल्याने येथे नुकसान भरपाईची परिगणणा करण्याची आवश्यकता नाही.

३४. वरीलप्रमाणे सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुतचा अपघात सदर मोटरसायकल चालकाच्या संयुक्त अथवा अंशदायी निष्काळजीपणाने झाल्याची बाब अर्जदार सिद्ध करु शकले नाहीत. तसेच अर्जदारांनी सदर जिप चालक, मालक आणि जिपच्या विमा कंपनीस प्रस्तुतकामी पक्षकार म्हणून सामिल केले नाही. त्यामुळे अर्जदार हे सामनेवालांकडून नुकसान भरपाईच्या मागणीच्या विविध तपशिलांतर्गत नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाहीत. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर 'होय' व मुद्दा क्रमांक २ व ३ चे उत्तर 'नाही' असे नोंदवून खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्जदार यांचा मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत येतो.

२. येणेप्रमाणे अंतिम हुकुमनामा करणेत यावा.

ARVIND WAGHMARE

Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2026.07.20 17:39:23 +0530

(अरविंद शं. वाघमारे)
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.

दि. २० जुलै २०२६

---